# अमरावती जिल्ह्यात उबाठा शिवसेने ला मोठी खिंडार

## जिल्हाध्यक्ष श्याम देशमुखसह अनेक पदाधिकाऱ्यांचा शिंदे सेनेत प्रवेश



### मुख्यमंत्र्याच्या उपस्थित नागपूरात पक्ष प्रवेश



मी शिवसेनेमध्ये विविध पदे भुषवित 33 वर्षे काम केले. माझा पक्षप्रमुख किंवा कोणत्याही नेत्याविरुध्द आकस नाही. परंतु मला जेव्हा जेव्हा संधी मिळण्याची वेळ आली, तेव्हातेव्हा माझ्याकडून संधी हिरावून घेतली. मी जितक्या निष्ठेने उध्दवजी ठाकरे यांच्या सोबत काम केले. त्याच निष्ठेने आता मी एकनाथजी शिंदे यांच्यासोबत काम करणार आहे.

**श्याम देशमुख,**
**उबाठा शिवसेना जिल्हाअध्यक्ष, अमरावती.**

### यांनी केला प्रवेश

शिवसेना जिल्हाप्रमुख श्याम देशमुख, आशिष धर्माळे, वर्षा भोयर, ललित झंझाड, राहुल माटोळे व असंख्य पदाधिकारी, नगरसेवक व कार्यकर्त्यांनी शिवसेनेत प्रवेश झाला.

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि.18 )**- विधानसभा निवडणूकीमध्ये महाविकास आघाडीतील सर्वच पक्षाच्या हाती अपयश आल्याने येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकांचा विचार करता अनेक पदाधिकारी सत्ताधारी पक्षाची कास धरताना दिसत आहेत.

अशातच आता अमरावतीमधील उबाठा गटाच्या शिवसेनेला मोठी खिंडार पडली आहे. जिल्हाध्यक्ष श्याम देशमुखसह अनेक पदाधिकाऱ्यांनी शिंदे गटाच्या शिवसेनेत प्रवेश केला आहे. बुधवारी (दि.18) यांनी नागपूर येथे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत व अभिजीत अडसूळांच्या मार्गदर्शनात या पदाधिकाऱ्यांनी पक्षप्रवेश केला.

राज्य विधानसभा निवडणूकीत महायुतीला घवघवीत यश मिळाल्यानंतर महाविकास आघाडीतील काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस व उबाठा शिवसेना पक्षातील पदाधिकाऱ्यांमध्ये अस्थिरतेचे वातावरण पहायला मिळत आहे. अश्यातच आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका तोंडावर असल्याने उबाठा सेनेतील अनेक शिवसैनिकांनी शिंदे सेनेत प्रवेश केला आहे. नागपूर येथे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात देवगिरी बंगला येथे प्रवेश समारोह पार पडला.

# सचिवांकडून लाखोंचा निधी हडप!

## दहेंद्री, काजलडोह, गांगरखेडा व हतरूमध्ये भ्रष्टाचार



**मारोती पाटणकर**
**चुरणी,( दि.18 )** - तालुक्यातील दहेंद्री, काजलडोह, गांगरखेडा व हतरू येथील ग्रामपंचायत मध्ये राबविण्यात आलेल्या महाराष्ट्र रोजगार हमी योजनेत काम करणारा रोजगार सेवकांच्या मागील तीन वर्षापासून लाखो रुपये आलेले कामाचे कमिशन सचिवांनी परस्पर हडप केल्याची तक्रार पंचायत समितीच्या खंडविकास अधिकाऱ्यांना करण्यात आल्याने एकच खळबळ उडाली आहे . तक्रार मिळताच बीडीओंनी चौकशीचे आदेश देण्यासह संपूर्ण कागदपत्र घेऊन उपस्थित राहण्याचे आदेश दिले.

राज्यात सर्वाधिक महाराष्ट्र रोजगार हमी योजनेची कामे मेळघाटच्या चिखलदरा तालुक्यात केली जाते. दररोज किमान 50 हजार पेक्षा मजूर उपस्थिती कामावर राहते. त्यामुळे लाखो रुपयांचे कमिशन रोजगार सेवकांना वर्षाकाठी मिळते. मागील तीन वर्षापासून हे कमिशन रखडले होते. ते आलेले कमिशन परस्पर सचिवांनी हडपल्याची तक्रार दहेंद्री येथे संजू भाना येवले यांनी खंडविकास अधिकाऱ्यांना केली आहे. हतरू गांगरखेडा व काजलडोसह इतरही ग्रामपंचायत मध्ये ग्रामसेवक योगेश महोरे व हतरु येथील तत्कालीन सचिव विनोद कांबळे यांनी हा प्रताप केल्याची लेखी तक्रार सादर करण्यात आली असून फौजदारी कारवाईची मागणी केली आहे.

दहेंद्री, गांगरखेडा, हतरू येथील ग्रामपंचायत मध्ये सचिवांनी ग्राम रोजगार सेवकांच्या कमिशनमध्ये अपार केल्याच्या तक्रारी मिळाल्या आहेत. त्या संदर्भात चौकशीचे आदेश देण्यात आले आहे. सिद्ध होताच कठोर कारवाई करण्यात येईल.

**शिवशंकर भारसाकळे,**
**बि.डी.ओ, पंचायत समिती, चिखलदरा.**

### दहेंद्रित वडिलांच्या नावाने धनादेश !

ऐकावं तेवढं नवलच मेळघाटात अपहाराच्या नवनविन पद्धती आता पुढे येऊ लागल्या आहे. ग्रामपंचायत सचिव व सरपंच यांनी संगणमत करून अपहर केल्याचा आरोप आहे. सचिव योगेश प्रभाकर माहोरे याने वडिल प्रभाकर गोविंद माहोरे यांचे नावे खाता क्र 2387826362 सेंट्रल बँक ऑफ इंडिया चिखलदरा येथून 7 जानेवारी ते 21 एप्रिल 2023 पर्यंत बँकेतून दोन लक्ष 96 हजाराचे धनादेश वटविले, असल्याची तक्रार संजय येवले यांनी केली आहे.

### हतरूमध्ये लाटले कमिशन

हतरु ग्रामपंचायत मार्च 2024 ते जुलै 2024 या कालावधीत 705400 इतर रोजगार सेवकांना कमिशन वाटप करण्यात आले. परंतु कारंजखेडा येथील रोजगार सेवक मोतीलाल कालु जामुनकर यांचे विडिओ विनोद कांबळे यांनी साठ हजार रुपये ग्रामसेवकाला दिले. त्यापैकी 10 हजार सरपंच यांचे पतीला व 20 हजार रु. स्वत: कमीशन ठेवल्याचे तक्रारित सांगण्यात आले आहे.

# पोहरा येथील अवैध सावकाराविरुध्द गुन्हा दाखल

## उपनिबंधक यांनी उगारला कारवाईचा बडगा

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.18 )** - विना परवाना सावकारी व्यवसाय करणार्या एका इसमाविरुध्द सहकारी संस्थेचे उपनिबंधक यांनी कारवाईचा बडगा उगारला. याप्रकरणात फ्रेजरपुरा पोलिस ठाण्यात 17 डिसेंबर रोजी उपनिबंधक अविनाश महल्ले यांच्या तक्रारीवरून सागर ज्ञानेश्वर गावंडे (रा.पोहरा) याच्याविरुध्द गुन्हा नोंदविण्यात आला. पोलिस तक्रारीनुसार, अंकुश हरिदास पवार (रा.चिरोडी, ता.चांदुर रेल्वे, जि.अमरावती) व अन्य काही नागरिकांनी सहकारी संस्थेच्या उपनिबंधक यांच्याकडे अवैध सावकार सागर गावंडेविरुध्द तक्रार दिली होती. या अनुंषगाने उपनिबंधक अविनाश महल्ले यांनी आरोपीवर सावकरी अधिनियम अनुसार योग्य कार्यवाही सुरु केली. सहकार विभागामार्फत सागर गावंडेंच्या दुकानावर धाड टाकून, त्याच्याजवळील कोरे चेक, पासबुक, प्रतिज्ञा लेख, स्थावर मालाची ईसार चिठ्ठी अशा प्रकारचे दस्तावेज जप्त करण्यात आले. त्यानंतर याबाबतची तक्रार फ्रेजरपुरा पोलिस ठाण्यात देण्यात आली.

# आंतरराज्यीय चोरटे पोलिसांच्या ताब्यात

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.18 )** - बस प्रवाशाचे लाखो रुपयांचे सोन्या-चांदीचे दागिने लंपास करणाऱ्या एका चोराला गाडगेनगर पोलिसांनी 16 डिसेंबर रोजी अटक केली. विरेन्द्र निहालसिंग मलिक (वय 40 वर्षे रा. अशरफ गड, ता. जि. जिन्द, राज्य हरीयाणा) असे आरोपीचे नाव आहे. त्याच्या ताब्यातून 4 लाख 45 हजार रुपये किमंतीचा सोन्या-चांदीचा मुद्देमाल जप्त केला आहे.

सुनीता रामेश्वर माकोडे (वय 52 वर्षे, रा. प्लॉट नं. 08 चतुर्थी पार्क कॉलनी, जावरकर लॉन, आमरावती) या 6 डिसेंबर रोजी सकाळी 9 वाजता नागपुर जाण्यासाठी निघाले होते. त्यांच्याजवळ घरातील सोन्या-चांदीचे दागीने असलेली ट्रॉली बॅगमध्ये होती. ते ट्रॉली बॅगमध्ये घेऊन बसमध्ये जात असतांना 30 ते 35 वयोगटातील अनोळखी इसमांनी हात चालाकीने बॅगमध्ये ठेवलेले सोन्या, चांदीचे दागीने व 15 हजाराची रोख असा एकुण 4 लाख 60 हजाराचा माल चोरुन नेला. या घटनेच्या तक्रारीवरून गाडगेनगर पोलिस ठाण्यात अज्ञात आरोपीविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला. सदर गुन्हाचा तपास करीत असतांना गाडगेनगरच्या डीबी पथकाने सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे व मिळालेल्या माहीतीवरुन जयस्तंभ चौक येथुन संशयीत इसम वीरेन्द्र नीहालसिंग मलिक (वय 40 वर्षे रा. अशरफ गड, ता. जि. जीन्द, राज्य हरीयाणा) यास ताब्यात घेतले. पोलिसांनी त्याची कसुन चौकशी केली असता त्याने सदरचा गुन्हा त्याचे साथीदारासह केल्याची कबुली दिली.

त्यामुळे पोलिसांनी आरोपीला अटक करून न्यायालयात हजर केले. न्यायालयाने आरोपीला पोलिस कोठडी सुनावली आहे. पोलिसांनी आरोपीच्या ताब्यातून 40 ग्रॅमचे मंगळसुत्र, नेकलेस 20 ग्रॅम, कानातले 5 ग्रॅम, कानातले 3 ग्रॅम, चांदीचे 4 कड्याचा जोड, चांदीच्या तोरड्यांचा जोड असे एकुण 15 ग्रॅम चांदीचे भांडे असा एकुण 4 लाख 45 हजाराचा माल जप्त केला. सदरची कार्यवाही पोलीस आयुक्त नविनचंद्र रेड्डी, पोलीस उपायुक्त सागर पाटील, सहाय्यक पोलीस आयुक्त अरुण पाटील, पोलिस निरीक्षक ब्रम्ह गीरी यांचे मार्गदर्शनाखाली करण्यात आली. सदर कार्यवाही गाडगेनगर डी.बी. पथक प्रमुख सहायक पोलिस निरीक्षक रमेश बाबर, पोलिस हवालदार निलेश जुनघरे, गजानन बरडे, संजय भेलाये, सागर धरमकर, सुशांत प्रधाण यांनी केली.

### गाडगे नगर डी.बी. पथकाची कार्यवाही

### 4 लाख 45 हजाराचा मुद्देमाल जप्त

# परतवाडा हद्दीतील कुख्यात गुंडावर एमपीडीए

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि.18 )**- परतवाडा येथील कुख्यात विजय ऊर्फ शुभम ऊर्फ बम नंदलाल बंका (नंदवंशी), (वय 28 वर्ष, रा. महावीर चौक, परतवाडा, ता. अचलपुर, जि अमरावती) यांच्याविरुध्द एमपीडीए कायद्यान्वये कारवाई करण्यात आली. त्याला जिल्हा मध्यवर्ती कारागृहात स्थानबध्द करण्यातआले आहे.

### जिल्हा कारागृहात स्थानबध्द

कुख्यात इसम विजय ऊर्फ शुभम ऊर्फ बम नंदलाल बंका (नंदवंशी), हा पोलीसांचे कारवाईला न जुमानता स्वत: तसेच साथीदारांसह शरीराविरुद्धचे व मालमत्ते विरुध्दचे दखलपात्र स्वरुपाचे गुन्हे करीत होता. खुन, खुनाचा प्रयत्न, जबरी चोरी करतांना इच्छापुर्वक दुखापत करणे, बलादग्रहण करण्याकरीता एखाद्या व्यक्तीला क्षती पोहचविण्याची भिती घालणे, घातक हत्यारांनी किंवा साधनांनी इच्छापुर्वक जबर दुखापत पोहचविणे, गैरनिरोध, इतरांचे जिवित किंवा व्यक्तिगत सुरक्षितता धोक्यात आणणारी कृती करणे, कोणत्याही वर्गाच्या धर्माचा किंवा धार्मिक श्रद्धांचा अपमान करुन धार्मीक भावनांवर अत्याचार करण्याच्या उद्देशाने बुद्धीपरस्पर आणि दृष्ट कृती करणे, दंगा करणे, प्राणघातक शस्त्रनिशी सज्ज होवुन दंगा करणे, मारहाण करणे, शिवीगाळ करणे, धमकी देणे, अनुसुचित जाती-जमातींचे इसमांवर अत्याचार करणे, मनाई आदेशाचे उल्लंघन करण्यासारखे गुन्हे करण्यामध्ये तो गुंतलेला होता. त्याने परतवाडा व अचलपुर शहरातील परिसरामध्ये गुंडप्रवृत्तीचा इसम म्हणून ओळख निर्माण करुन नागरिकांमध्ये दहशत निर्माण केली होती. जिल्हादंडाधिकारी सौरभ कटियार यांनी सर्व कायदेशिर बाबींची पडताळणी करुन तसेच नमुद इसम हा कुख्यात धोकादायक इसम असल्याची स्वत:चे स्त्रोतामार्फत खात्री करुन त्यास अमरावती जिल्हा मध्यवर्ती कारागृहात स्थानबद्ध ठेवण्याबाबतचा आदेश 16 डिसेंबर रोजी पारित केला आहे.

# पांढऱ्या सोन्याची साडेसाती सपेना!

## दर घसरल्याने बळीराजा संकटात



**महासागर प्रतिनिधी**
**पथ्रोट, ( दि.18 )** - दरर्षीच्या दुष्काळात शेतकरी होरपळून निघतो. यंदा चांगला पाऊस पडून जोमात उत्पन्न येईल असे अनेक शेतकऱ्यांनी यावर्षी कापूस पिकाला पसंती देत लागवड मोठ्या प्रमाणात केली. बिज निमीर्ती कापुस बोंडाने समग्र सृष्टीतील जारज निर्मीत मानवाचे अंग झाकुण लज्जा रक्षण केले. जगाचा पोशींद्या जणु पांढरे सोने तयार करीत असतो. पिवळ्या सोन्याचे भाव क्षणोक्षणी गुंजेसह तोळामास्याने वाढत असताना पांढरे सोने कवडीमोल भावाने विकत आहे.

खते कीटकनाशकाच्या दरवाढीने शेतकऱ्यांचे आधीच कंबरडे मोडले आहे. आता कापूस विक्रीला आला असताना कापसाचे भाव पडले आहेत. त्यामुळे यंदाही कापसामागची साडेसाती काही केल्या संपायचे नाव घेत नसल्याने शेतकरी संकटात सापडला आहे. कापूस पिकावर केलेला भरमसाठ खर्चही निघतो की नाही अशी परिस्थिती आहे.

कापूस लागवड झाल्यावर कापसाला तीन ते चार खतांचे डोस द्यावे लागतात. परंतु दिवसेंदिवस खताच्या किमतीत वाढ होत असून यामुळे शेतकऱ्यांचे कंबरडे मोडत आहे. यामुळे शेतकरी वैतागले आहेत.

### कापसाचा भाव वाढणार

सध्या कापसाला भाव प्रति क्विंटल 6 ते 7 हजार रुपये क्विंटल आहे. या वर्षी कापसाचा भाव सुरुवातीपासून घसरलेला आहे. यामुळे शेतकरी चिंतेत आहेत.अनेक शेतकरी कापसाला चांगला भाव मिळत नाही. तोपर्यंत कापूस विक्री करत नाहीत, परंतु तो साठवून ठेवण्यासाठी कसरत करावी लागते. कापसाचा भाव 7 हजार पेक्षा जास्त वाढेल अशी अपेक्षा शेतकऱ्यांना आहे.

### बोंडअळीने औषधी महाग

लागवडीपासून कापूस पिकाला सात ते आठ वेळा कीटकनाशकांची फवारणी करावी लागते. सात ते आठ वेळेस फवारणी करूनसुद्धा शेवटी बोंडअळी टपलेलीच असते. महागड्या औषधांची फवारणी करूनही बोंडअळीवर कुठलाच परिणाम होत नसून या अळीमुळे कापसाच्या उत्पादनात घट होते. कापूस वेचणीला दहा रुपये किलोचा भाव देऊनसुद्धा वेळेवर मजूर मिळत नसल्याने कापूस वेचणीअभावी शेतात आहे. वेळेवर कापूस वेचला नाही तर वजनही घटण्याची भीती शेतकऱ्यांना असते. आपल्याकडे कापसाची खरेदी ही मोठ्या जिनिंगच्या भावानुसार केली जाते. मोठ्या जिनिगला जो भाव देतात त्यापेक्षा थोड्या कमी फरकाने ग्रामीण भागात कापसाची खरेदी केली जाते. वरचे भाव वाढले की आम्हीही कापसाला भाव देतो कापूस व्यापारी सांगतात.

### नव्या कापुस भावास साडेसाती

यावर्षीचा कापूस विक्रीसाठी बाजारात येऊ लागला आहे; परंतु याही वर्षी कापसाला चांगला भाव मिळत नसल्याने शेतकरी पुन्हा अडचणीत सापडत चालला आहे. गतवर्षीच्या तुलनेत यावर्षी कापसाला चांगला भाव मिळेल या आशेने अनेक शेतकऱ्यांनी कापसाचा पेरा केला होता. मात्र यंदाही भावच मिळत नसल्याने पुन्हा शेतकरी निराश झाला असून नव्या कापसाच्या मागे यंदाही साडेसातीच आहे.

### पाच वर्षात एकदाच 10 हजारापुढे भाव

| वर्ष | भाव |
|---|---|
| 2019 | 5500 |
| 2020 | 5500 |
| 2021 | 7000 |
| 2022 | 10,000 |
| 2023 | 7000 |
| 2024 | 7000 |

### पाच वर्षात एकदाच 10 हजारांपुढे भाव

गेल्या पाच वर्षापासून कापसाचे भाव स्थिर आहेत. 2022 मध्ये एकदाच कापसाला दहा हजार रुपये भाव मिळाला होता; परंतु नंतर कापसाच्या दरात वारंवार घसरण होत गेली. यावर्षी 7000 पेक्षाही कमीच भाव मिळत आहे. 10 हजार रुपये भाव मिळावा, अशी अपेक्षा आहे.


### दुरूस्तीपत्रक

**महाराष्ट्र शासन**
**उपजिल्हाधिकारी ( भूसंपादन ), अ.व.प्र.क्र.-४,**
**जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती- ४४४६०२**
**दुरध्वनी क्रमांक ०७२१-२६६३४४९ ईमेल. slaouwp@gmail.com**

उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), अ.व.प्र.क्र. -४ अमरावती यांचे पत्र क्र. मं.अ./अवप्रक्र.४/कावि ३३६/२०२४, दि. १२/०८/२०२४ अन्वये उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), अ.व.प्र.क्र.-४, अमरावती यांच्या फाईलवरील भूसंपादन प्रकरण क्रमांक ०१/४७/२०२३-२०२४ मौजा पर्वतापूर, ता. जि. अमरावती या प्रकरणात कलम १९ ची अधिसूचना दै. महासागर या वृत्तपत्रात, दि. २२/०९/२०२४ रोजी प्रसिद्धी झाली आहे. ती खालील प्रमाणे वाचावे.

| ऐवजी | | | असे वाचावे | | |
|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | सर्व्हे क्र./गट क्र. | संपादन करावयाचे क्षेत्रफळ (हे.आर) | अ.क्र. | सर्व्हे क्र./गट क्र. | संपादन करावयाचे क्षेत्रफळ (हे.आर) |
| ११ | १२/५ पैकी | २.३६ | ११ | १२/५ पैकी | ०.३६ |

**उपजिल्हाधिकारी ( भूसंपादन )**
**अ.व.प्र.क्र.-४, अमरावती**


आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# अमोल इंगळे यांच्या हत्येच्या निषेधार्थ अंबाडा येथे कडकडीत बंद

## आरोपीला कडक शिक्षा करण्याची मागणी






**महासागर प्रतिनिधी**

**मोर्शी (दि. 18)** - अस्तगाव येथील ग्रामपंचायत सदस्य तथा शिल्प कारागीर अमोल इंगळे याची अंबाडा येथील एका बारमध्ये झालेल्या हत्येच् निषेधार्थ अंबाडा येथे भारतीय जनता पार्टी तथा गावकऱ्यांतर्फे दिनांक 18 डिसेंबर रोजी बाजारपेठ तथा शैक्षणिक संस्था बंद ठेवून कडकडीत बंद पाडण्यात आला. यातील आरोपीला कडक शिक्षा करण्याची मागणी यावेळी भाजप पदाधिकारी व गावकरी यांनी केली.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, अंबाडा येथील ओ शेठ बारवर दि.14 डिसेंबर रोजी संध्याकाळी साडेसात वाजताच्या दरम्यान आरोपी समिर शहा कदीर शहा (वय 30 वर्ष) याने शुल्लक कारणावरून मृतक शिल्पकार अमोल इंगळे याला लाथा बुक्क्यांनी जबर मारहाण केली. त्याला नातेवाईकांनी उपचारार्थ नागपूर येथे नेले असता रुग्णालयात उपचारापूर्वीच त्याला डॉक्टरने मृत्यू घोषित केले. मृतक अमोल इंगळे हा अंबाडा येथून तीन किलोमीटर अंतरावर असलेल्या आष्टगाव येथील रहिवासी असून तो नेहमी अंबाडा येथे यायचा.

सर्वाधिक मित्र परिवार त्यांच्या अंबाडा येथे होता. तसाच ग्रामपंचायत सदस्य तथा सुप्रसिद्ध मूर्तिकार असल्याने तो मोर्शी तालुक्यात सुपरिचित होता. त्याच्या प्रेमळ तथा सामाजिक व्यक्तिमत्त्वाने त्याने अनेकांची मने जिंकली होती. त्याच्या जाण्याने अंबाडा येथील मित्रपरिवार सुद्धा शोकाकुल झाला. झालेल्या घटनेच्या निषेधार्थ अंबाडा येथे भाजपा तथा गावकऱ्यांच्या वतीने स्वयंस्फूर्तीने दि. 18 डिसेंबर रोजी बंदची हाक देण्यात आली होती. त्यामुळे अंबाडा येथील संपूर्ण बाजारपेठ आणि शैक्षणिक संस्था बंद ठेवण्यात आल्यात. यावेळी भाजपाचे कार्यकर्ते रुपेश ढोले, सारंग खोडस्कर, अनिरुद्ध तडस, रजत बारस्कर, संतोष बिजवे, अभिजीत कविटकर, नितीन तडस इत्यादींचा समावेश होता.


> आरोपी समीर शहा कदीर शहा हा अंबाडा येथील रहिवासी असून तो सराईत गुन्हेगार वृत्तीचा आहे. त्याला कायद्याने शिक्षा द्यावी असे निवेदन भाजपाच्या वतीने उपविभागीय पोलीस अधिकारी तथा पोलीस निरीक्षक यांना देणार आहे.
>
> **रुपेश ढोले,**
> **भाजपा अल्पसंख्यांक महामंत्री**

> मृतक अमोल इंगळे हा सुप्रसिद्ध मूर्तिकार होता. तो संत तथा महापुरुषांच्या मूर्ती हुबेहूब बनवीत होता. त्याला बाहेर जिल्ह्यातून ऑर्डर येत होत्या. तो ग्रामपंचायत सदस्य होता. गावाचा विकासात त्याचे योगदान होते. त्याच्या जाण्याने गावकऱ्यांना खूप दु:ख झाले आहे.
>
> **दर्शन म्हाला,**
> **सरपंच ग्रामपंचायत आष्टगाव.**

# वेतन शासनाचे, प्रक्टीस खाजगी!

## जिल्हाधिकाऱ्यांनी अश्या डॉक्टरांवर कारवाई करावी

### रुग्णांची मागणी



**महासागर प्रतिनिधी**

**वरुड,(दि.18)** - रुग्णांना चांगली आरोग्याची सेवा मिळावी म्हणून शासन विविध योजना राबवत आहे. लाखो रुपये वेतन देऊन शासकीय रुग्णालयात डॉक्टरांची नियुक्ती करण्यात आली. मात्र असे असतानाही डॉक्टर शासकीय वेतन घेऊन खाजगी रुग्णालय थाटून दुकानदारी चालवित आहेत. ही बाब जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांच्या लक्षात केव्हा येणार? असा प्रश्न निर्माण झाला आहे. जर असा प्रकार आढळून आल्यास त्यांच्यावर सेवा समाप्तीची कारवाई जिल्हाधिकाऱ्यांनी करावी अशी मागणी रुग्णांकडून केल्या जात आहे.

वेतन सरकारी आणि प्रॅक्टिस खाजगी अशीच अवस्था असल्याने शासकीय रुग्णालयात नर्स आणि कंपाउंडर यांच्याद्वारे उपचार होत आहे. तळागाळातील नागरिकांना दर्जेदार उपचार मोफत मिळावा याकरिता राष्ट्रीय आरोग्य अभियान सुरू करण्यात आले आहे. या अभियानांतर्गत विविध उपक्रम राबविण्यात येत आहे. रुग्णालयापासून गावापर्यंत पोहोचून रुग्णसेवा द्यावी असा त्यामागचा शासनाचा हेतू आहे. या अभियानाकरिता मोठ्या प्रमाणात निधीची तरतूद करण्यात आली आहे. या अभियानात कंत्राटी तत्त्वावर अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या अभियानातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी अनेकदा कायम करण्याची मागणी केली आहे. रुग्णालयात वैद्यकीय अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. मात्र राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानांतर्गत कार्यरत वैद्यकीय अधिकारी मुख्यालयात न राहता व परवानगी न घेता खाजगी व्यवसाय करतात त्याचा दैनंदिन कामावर विपरीत परिणाम होत आहे. परिणामी राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कार्यरत वैद्यकीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारचे खाजगी वैद्यकीय सेवा देण्यात येऊ नये असे स्पष्ट आदेश आहे, अशा प्रकारचे खाजगी सेवा देणारे वैद्यकीय अधिकारी आढळल्यास त्यांना कारणे दाखवा नोटीस व खुलासा मागविण्यात यावा समाधानकारक खुलासा नसल्यास त्यांना संबंधित डॉक्टरांची सेवा समाप्त करण्यात यावे असे कडक आदेश जिल्हाधिकाऱ्यांनी दिल्यास तरच काही फरक पडेल अन्यथा नाही असेही बोलल्या जात आहे. जिल्हा आरोग्य कार्यालयांतर्गत तालुक्यातील रुग्णालयातील राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानांतर्गत कार्यरत वैद्यकीय अधिकारी यांनी खाजगी सेवा देऊ नये असे आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल असे असतानाही आजही डॉक्टरांची खाजगी प्रॅक्टिस सुरूच आहे, हे विशेष.

# प्रथम एज्युकेशन फाऊंडेशन कडून स्प्रिंग व्हिजनचे प्रशिक्षण

## असंख्य विद्यार्थ्यांनी घेतला सहभाग



**महासागर प्रतिनिधी**

**वरुड,(दि.18)** - शहरातील प्रथम एज्युकेशनच्या एका हॉलमध्ये अनुभवी शिक्षकांकडून प्रथम एज्युकेशन फाउंडेशन कडून स्प्रिंग व्हिजनचे प्रशिक्षण देण्यात आले. या प्रशिक्षणामध्ये तालुक्यातील असंख्य विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.

प्रथम एज्युकेशन फाउंडेशन अंतर्गत चालणाऱ्या हमारा गाव आणि इतर सर्व उपक्रमाची माहिती देण्यात आली आणि आपण कशाप्रकारे गावांमध्ये काम करतो हे स्वयंसेवकांना प्रास्ताविका दरम्यान सांगण्यात आले. यावेळी स्पर्धा परीक्षेचे मार्गदर्शन करणारे नारिंगे उपस्थित होते. स्वयंसेवकांचे परिचय आणि मनोगत घेण्यात आले मनोगत दरम्यान स्वयंसेवकांचा सहभाग खूप चांगला होता. स्वयंसेवकांनी आपल्या गावाची जबाबदारी आपण कशाप्रकारे घ्यायला पाहिजे याबद्दल स्वत:चे मत मांडले. सोबतच आपण मुलांचे शिक्षणामध्ये कशाप्रकारे मदत करत आहोत आणि आपण आणखी कशाप्रकारे मदत करू शकतो, याबद्दल स्वयंसेवकांनी आपले मत मांडले. सोबतच स्वयंसेवकांना स्प्रिंग व्हीजन बद्दलची पूर्णत: माहिती देण्यात आली.

आपण मुलांची डोळे कशा प्रकारे चेक करणार आहोत, कशाप्रकारे आपण तो फॉरमॅट भरून घेणार आहोत आणि ज्या मुलांना डोळ्यांमध्ये काही प्रॉब्लेम आहेत, त्या मुलांच्या घरी जाऊन आपल्याला माता पालकांना कशाप्रकारे समजून सांगायचे आहे. याबद्दलची पूर्णत: माहिती स्वयंसेवकांना देण्यात आली. नंतर प्रत्यक्ष प्रात्यक्षिक करून बघण्यात आले स्वयंसेवकांचे डोळे स्केलन चार्टच्या माध्यमातून चेक करण्यात आले. नारिंगे यांनी स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले तळागळातील स्वयंसेवक जशी आपल्या गावासाठी काम करतात. अशा मुलांना आपणही काहीतरी सहकार्य करायला पाहिजे त्यांचे शिक्षणामध्ये त्यांना एक संधी द्यायला पाहिजे. या उद्देशाने पण प्रथम मध्ये स्वयंसेवक म्हणून काम करीत असलेल्या कोणत्याही मुलाला 50 टक्के डिस्काउंट क्लासेस मध्ये मिळेल हे आपल्या मार्गदर्शनामधून सांगितले. सोबतच कॉम्पिटिशनच्या या युगामध्ये आपण कशाप्रकारे आपली स्वत:चे अस्तित्व निर्माण करायला पाहिजे कशाप्रकारे आपण पर्सनॅलिटी डेव्हलपमेंट करायला पाहिजे या सर्व गोष्टीवर नारिंग यांनी खूप चांगल्या प्रकारे प्रकाश टाकला.

# सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येमधील आरोपींना कठोर शासन करा!

## अंजनगाव सुर्जी येथील जिजाऊ ब्रिगेडची मागणी




**महासागर प्रतिनिधी**

**अंजनगाव सुर्जी(दि.18)** - बीड जिल्ह्यातील मसाजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांची दि.9 डिसेंबर रोजी अपहरण करून निर्घृण हत्या करण्यात आली. या घटनेचा निषेध म्हणून संपूर्ण महाराष्ट्रभर जिजाऊ ब्रिगेड कडून करण्यात येत आहे. स्थानिक अंजनगाव सुर्जी जिजाऊ ब्रिगेड कडून सुद्धा तहसीलदारांना निवेदन देऊन या घटनेचा जाहीर निषेध करण्यात आला.

निवेदनात सांगितले की, सदरील हत्या ही माणुसकीला काळीमा फासणारी आहे. या हत्येमागे एक मोठी बलाढ्य शक्ती आहे. ज्यामुळे समाजातील निरपराध लोकांचा बळी जात आहे. या प्रवृत्तीला वेळीच आवर घातला नाही तर समाजाचा पोलीस यंत्रणेवर व न्याय व्यवस्थेवर विश्वास राहणार नाही. अशा घटना घडतच राहतील. परभणी येथे सुद्धा नुकतीच एक संतापजनक घटना घडली. आंदोलन कर्ते व संविधान रक्षक एड.सोमनाथ सूर्यवंशी यांचा देखील पोलीस कोठडीत मृत्यू झाला. या दोन्ही प्रकरणातील दोषींना कठोरातील कठोर शिक्षा व्हावी अशी मागणी जिजाऊ ब्रिगेडच्या वतीने निवेदन देतेवेळी करण्यात आली आहे. निवेदन देतेवेळी प्रदेशाध्यक्षा सीमा बोके, तालुकाध्यक्षा सारिका मानकर, स्वाती लहाने, स्मिता लहाने, स्वाती मानकर, वैशाली बोडके, सुषमा कोकाटे, हर्षा चऱ्हाटे, शीतल बोके, स्वाती सरायकर यांच्यासह महिला पदाधिकारी व कार्यकर्त्या उपस्थित होत्या.

# ध्वजदिन निधीस सढळ हाताने मदत करावी -जिल्हाधिकारी

## ध्वजदिन निधी संकलनाचा उत्साहात शुभारंभ

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,(दि.18)** - आपल्या राज्याला शौर्याची परंपरा लाभलेली असून देशाच्या सीमेवर लढताना राज्यातील अनेक जवानांना हौतात्म्य आलेले आहे. अमरावती जिल्ह्यातील दहा जवानांना वीरमरण प्राप्त झाले आहे. मला प्रशिक्षण कालावधीत सैनिकांसोबत राहण्याची संधी मिळाली, त्यावेळी सैनिकांना कोणत्या परिस्थितीचा सामना करावा लागतो याबाबत अनुभव आले. शहीद सैनिकांच्या कुटुंबियांचे जीवन सुसह्य व्हावे यासाठी कल्याणकारी निधीतून योजना राबविल्या जातात. त्या करिता ध्वजनिधी संकलित केला जातो. त्यामुळे जास्तीत-जास्त ध्वजनिधी संकलित करण्यासाठी प्रत्येकाने सढळ हाताने मदत करावी, हीच खरी शहीद जवानांना श्रध्दांजली होईल ,असे प्रतिपादन जिल्हाधिकारी सौरभ कटीयार यांनी केले.

जिल्ह्याचा सशस्त्र सेना ध्वजदिन 2024 निधी संकलन शुभारंभ कार्यक्रम व माजी सैनिक मेळावा नुकताच जिल्हाधिकारी कार्यालय येथे संपन्न झाला. यावेळी सेना मेडल कर्नल अक्षय भगत, ई. सी.एच.एस. पॉलीक्लिनीक ऑफिसर इन्चार्ज कर्नल आर. डी.गौर, शिवाजी शिक्षण संस्थेचे सचिव विजय ठाकरे, कोषाध्यक्ष दिलीप इंगोले, कर्नल लक्ष्मण गाले व सेना मेडल (निवृत्त) जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी मेजर आनंद शरद पाथरकर आदी उपस्थित होते. जिल्हाधिकारी पुढे म्हणाले, मागील वर्षी अमरावती जिल्ह्यास शासनाने दिलेले 1 कोटी 10 लक्ष रुपयांचे ध्वजनिधी संकलित करण्यासाठी उद्दिष्ट वेळेपूर्वीच पूर्ण केले असून 1 कोटी 38 लक्ष निधी संकलीत करुन उद्दिष्ट 126.18 टक्क्याने पूर्ण केले. याबद्दल जिल्ह्यातील नागरिक, शासकीय, निमशासकीय विभागातील अधिकारी, महाविद्यालय, शाळेतील मुख्याध्यापक, शिक्षक , कर्मचारी यांचे आभार मानले. तसेच यावर्षीही शासनाने दिलेले उद्दिष्ट वेळेपूर्वीच 100 टक्के पेक्षा जास्त टक्क्यांनी साध्य करण्यासाठी आपले उद्दिष्ट पूर्ण करावे, असे आवाहन केले.

# सदैव जनतेच्या सेवेत राहणार

## आभार मेळाव्यात प्रिती बंड यांचा निर्धार पदाधिकारी, कार्यकर्ता, जनसामान्यांसाठी लढत राहु



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,(दि.18)**- अपक्ष निवडणूक लढत असताना विधानसभा निवडणुकीत 60 हजार मते मिळाली. यात पराभव जरी झाला असला, तरीसुध्दा जे माझ्या पाठीशी खंबीरपणे उभे होते, त्या सर्वांची माझ्यावर जबाबदारी आहे. मी सदैव त्या जनतेच्या सेवेत राहणार असल्याचा निर्धार प्रिती बंड यांनी व्यक्त केला. सोमवारी दुपारी 12 वाजता सातुर्णा परीसरात महेंद्र लॉन येथे आभार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. मात्र या मेळाव्याचे आपोआप निर्धार मेळाव्यात रुपांतर झाले. यावेळी मेळाव्याला माजी आ. ज्ञानेश्वर धाने पाटील यांच्यासह नाना नागमोते, जितु दुधाने, मनोहर डेहनकर, सुनील राऊत, संजय शेटे, हरिष मोहोड, उमेश घुरडे, साजिद भाई, अनिल सोनटक्के, नितीन हटवार, अविनाश वानखडे, धनजय बंड, नितीन तारेकर आदी उपस्थित होते. यावेळी अनेक पदाधिकारी,कार्यकर्त्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

प्रिती बंड म्हणाल्या की, समोर उपस्थित असलेले सर्व संजय बंड यांच्यावर प्रेम करणारे अती महत्वाचे तसेच सर्व शिवसैनिक आहे. संजय भाऊंचा सर्व महत्त्वाचा परिवार आज आपल्या समोर बसलेला आहे. या सर्वांचे खूप खूप आभार मानते. खरंतर हा आज आभार मेळावा होता. कारण एका सामान्य महिला, जिच्या मागे पक्ष नव्हता जिच्याकडे पैसा नव्हता तिच्या मागे चिन्ह नव्हतं अशा महिलेला तुम्ही साथ दिली. कोण म्हणते की जगात इमानदारीला महत्त्व नाही आहे. प्रामाणिकतेला महत्त्व आहे, हे तुम्ही सगळ्यांनी सिद्ध करून दाखविले. आजही एका इमानदार, एका खुद्दार व्यक्तीला जो मानसन्मान मिळतो तुम्ही सगळ्यांनी मतदानातून मला मिळवून दिला. अपक्ष असताना 60 हजारांपेक्षा अधिक मते मिळाली. आता या सर्वांची जबाबदारी आहेच. शिवाय सर्व सामान्य जनतेच्या सेवेत यापुढे सदैव कार्यरत राहणार असा निर्धार यावेळी व्यक्त केला. ईव्हीएममध्ये घोटाळा झालाच, कारण निवडणुकीच्या वेळी असलेले वातावरण पाहता, विजय आपलाच दिसत होता, मात्र निकाल वेगळाच लागला, असेही बंड यावेळी म्हणाल्या. यावेळी मेळाव्याला अनिल नंदनवार, आंनद इंगळे, अनिल मोहोड, निलेश जामठे, नागोराव भटकर, चंद्रशेखर धाकडे, ज्ञानेश्वर लकडे, अय्याजभाई, पप्पु आवारे, पवन देशमुख, सचिन धुमाळे, विकास ठाकरे, सचिन वानखडे, बाळा सोळंके, प्रवीण धुमाळे, नितीन घडेकर, नारायण दहाट,गजानन डोंगरे,वसंत गौरखेडे,कृष्णा गव्हाळे, अशोक कैथवास, संजय विघे, चंदन नागमोते,दिवाकर कुटे, अनिल रहाटे, किशोर निकम, योगेश आवारे, पृथ्वीराज मोहोरे, आदित्य कुटे, सुधीर डोंगरदिवे, तेजस पोहेकर, ज्ञानेश्वर दिवाण, गजेंद्र जिचकार, राहुल कणसे, राजु कुयटे, पराग कुपटे, शंकर पारवे, पद्माकर धोटे, यांच्यासह सह शेकडो पदाधिकारी, कार्यकर्ते, नागरिक व संजय बंड मित्रपरीवाराची मंडळी उपस्थित होती.

### एक लढाई संपली की दुसरी लढाई सुरू!

यावेळी माजी आ.ज्ञानेश्वर धाने पाटील यांनी सुद्धा आपले विचार मांडले. ही शेवटची लढाई नाही. एक लढाई संपली की दुसऱ्या लढाईची तयारी करायची असते. आजपासूनच पुढच्या पाच वर्षांनी होणाऱ्या निवडणुकीच्या कामाला लागायचे. त्या हिशेबाने सगळ्या गोष्टीवर लक्ष ठेवावे लागणार आहे. महानगरपालिका निवडणूक, जिल्हा परीषद निवडणूक कुणाला सोबत घेवून लढायची हे आपण सर्वांनी मिळवून ठरवू. जर आपण कुण्या पक्षात गेलो तर पुन्हा आपल्याला त्यांच्याच निर्णयावर अवलंबून रहावे लागेल. त्यामुळे आपण आपलेच संघटन मजबुत करू आणि भविष्याची लढाई एकजुटीने लढू, असे मत यावेळी माजी आ.ज्ञानेश्वर धाने पाटील यांनी व्यक्त केले. यावेळी त्यांनी शिवसेनेचे उपनेते सुधीर सूर्यवंशी आणि शिवसेनेचे उमेदवार सुनिल खराटे यांच्यावर टीकास्त्र सोडले. हे आता डमी असल्याचे जनतेने दाखवून दिले. ते बडनेरातून संपले आहेत. त्यामुळे बडनेरात आता केवळ आ. रवि राणा आणि आपण हे दोघेच प्रतिव्दंदी आहेत आणि जनता आपल्या पाठिशी आहे, हे मिळालेल्या मतांवरून स्पष्ट होते, असे धाने पाटील म्हणाले. यावेळी अनेक कार्यकर्ते आणि पदाधिकारी,या पक्षात जावे,त्या पक्षात जावे,पुन्हा मातोश्रीवर जावून उद्धव ठाकरेंची भेट घ्यावी, काहींनी स्वतऱ्च आपले अस्तित्व कायम ठेवून संघटना उभारावी, अशी विविध मतमतांतरे व्यक्त केली. पण, प्रितीताई जो काही निर्णय घेणार,तो मान्य करून सदैव साथ देण्याचा निर्धार यावेळी सर्वांनी व्यक्त केला.

# आज विजयग्रंथाचा पारायण सोहळा



**बडनेरा** - येथील माळीपुरा चौक, जुनी वस्तीमधील श्रीगजानन महाराज मंदिरात सामुहीक पारायण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. गुरुवार, 19 डिसेंबर रोजी सकाळी 7 वाजता हे पारायण होणार आहे. ज्या भाविक भक्तांना पारायणाकरिता बसायचे असेल त्यांनी व ज्यांना देणगी स्वरुपात सहकार्य करायचे असेल, त्यांनी आयोजक समितीकडे संपर्क करण्याचे आवाहन करण्यात आले. जास्तीत जास्त भाविकांना सहभागी होण्याचे आवाहन आहे. व्यासपीठ पारायण वाचक म्हणून संध्या सुहास देशपांडे उपस्थित राहणार आहेत. पहाटे 5 वाजता 'श्रीं'चा अभिषेक, सकाळी 7 वाजता पारायणाला प्रारंभ, दुपारी 3 वाजता गावातून शोभायात्रा, त्यानंतर सायंकाळी महाआरती आणि प्रसादाचे वितरण करण्यात येईल

# ग्रामीण भागात कलम 37(1) व (3) लागू

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,(दि.18)** - जिल्ह्यात शांतता व सुव्यवस्था अबाधित राहावी, यासाठी पोलीस अधीक्षक (ग्रामीण), अमरावती यांनी महाराष्ट्र पोलिस अधिनियम 1951 चे कलम 37 (1) व (3) अन्वये प्रतिबंधात्मक आदेश जारी केला आहे.

सदर प्रतिबंधात्मक आदेश जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी, याकरिता पोलिस आयुक्तालय परिक्षेत्र वगळून अमरावती जिल्ह्यातील ग्रामीण भागात लागू करण्यात आला असून दि. 19 डिसेंबर 2024 ते 2 जानेवारी 2025 च्या मध्यरात्रीपर्यंत लागू राहील. या कलमाचा भंग करणाऱ्या व्यक्तीविरूध्द कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असे अपर जिल्हादंडाधिकारी अनिल भटकर यांनी कळविले आहे.